# छत्रपती शिवरायांचे शासन आणि प्रशासन

प्रा. डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी (गंगणे)



Late Ramesh Warpudkar ... College, Sonpeth
Dist. Parbhani

**छत्रपती शिवरायांचे शासन आणि प्रशासन**

लेखिका :- प्रा. डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी (गंगणे)

ISBN 978-93-91689-58-2

अरुणा प्रकाशन
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

© सर्व हक्क लेखकाधिन

: प्रथम आवृत्ती :- फेब्रुवारी २०२३

: मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

: अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

: मुखपृष्ठ : विरभद्र गुळवे

मूल्य : १२०.०० रुपये

*"छत्रपती शिवरायांचे शासन आणि प्रशासन" या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी प्रकाशन, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

# प्रस्तावना

शिवरायांचे आठवावे रूप।
शिवरायांचा आठवावा प्रताप।
शिवरायांचा आठवावा साक्षेप।
भुमंडळी।

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला लाभलेले आराध्य दैवत आहेत. ज्यांच्या पराक्रमांच्या गाथा पिढ्यानपिढ्या आपण ऐकत अहोत आणि ऐकत राहू. छत्रपती शिवरायांचे व त्यांच्या कर्तृत्वाचे गोडवे गाण्यासाठी कितीही शब्द वापरले तरीही ते अपुरेच पडतील. मराठी मुलुख हा तत्कालीन आदिलशाही, निजामशाही, मोगलशाही सत्तांचा वारंवार भक्ष बनवायचा. यवनी सत्तांच्या विरुद्ध प्रतिकूल परिस्थितीत सामना करत छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची निर्मिती करून मरगळ प्राप्त झालेल्या मराठी मुलखात नवचैतन्य व नवजीवन देण्याचे काम केले. अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र आणून स्वराज्याचा गाडा हाकण्याचे काम त्यांनी केले. राजांच्या कर्तुत्वाचा विचार करता केवळ त्यांनी केलेल्या समरांगणावरील पराक्रमाचा आढावा आपण घेतो. छत्रपती शिवराय म्हणजे शाहिस्तेखानाचे बोटे छाटणारे, अफजलखानाचा कोथळा काढणारे किंवा आग्रा भेटीत महाराजांना औरंगजेबाने नजरकैद ठेवल्यानंतर त्याच्या हातावर तुरी देऊन निसटणारे, आपणास आठवतात. परंतु हे महाराजांच्या अथांग व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू आहे. यासोबतच आपणास छत्रपती शिवरायांमधील कुशल प्रशासक, न्यायप्रिय राजा, लोककल्याणकारी जाणता राजा, सर्वधर्मसमभाव शिकवण देणारा शासक या त्यांच्या पैलूंनाही पाहता येते.

केवळ शत्रूचा शेवट करून स्वराज्य निर्माण करता येत नाही, तर त्यासाठी उत्तम प्रशासन मंडळ निर्माण करणे गरजेचे असते. म्हणून की काय